# Session : 8

## Date : 23/09/25

### News : Nipakshvrutsatta

PRGI No.MHMAR/25/A0774

# निपक्ष वृत्तसत्ता

संपादक – निलेश भोसले (मास्टर ऑफ जर्नालिझम / बॅचलर ऑफ जर्नालिझम)

September 23, 2025 | Page no 4

Powered By EpaperOnline.in

# कैं.मथुरा प्राथमिक व कैं.रामचंद्र माध्यमिक आश्रम शाळा कामती मध्ये सायबर सुरक्षेवर जनजागृती कार्यक्रम

निपक्ष वृत्तसत्ता न्यूज नेटवर्क

कामती: कैं.मथुरा प्राथमिक व कै.रामचंद्र माध्यमिक आश्रम शाळा कामती येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील विद्यार्थिनी तृप्ती पवार आणि श्रुती जंगलगी यांनी सायबर गुन्हेअंतर्गत होणारे गुन्हे आणि नुकसान इत्यादीबाबत सविस्तर माहिती दिली. सोशल मीडिया अकाउंटला टू फॅक्टर ऑथेंटिकेशन लागू करणे , व मजबूत पासवर्ड कसा असावा याबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील अनेक लोक हे सायबर फ्रॉडचे बळी पडले असून, विद्यार्थ्यांनी घरातील नागरिकांची जनजागृती करावी. सरकारने अनेक योजना सुरू केल्या असून, यामध्ये फ्रॉड करणाऱ्या व्यक्तीदेखील मोठ्या प्रमाणात ॲक्टिव्ह झाल्या आहेत. वेगवेगळे ॲप तयार करून ओटीपी घेऊन नागरिकांच्या खात्यातील रक्कम हडप करतात. चुकीच्या वेबसाईटवर सर्च केल्यास नुकसान होते. असे प्रकार रोखण्यासाठी नागरिकांना सजग व सतर्क करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. आशा प्रकारे आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकी बद्दल उदाहरणाद्वारे माहिती दिली. यावेळी अध्यक्षीय स्थानावर असलेले शाळेचे प्राचार्य कुबेर शिंदे सर यांनी मार्गदर्शन केले.

